Gmail

मिरा भाईंदर महानगरपालिका
पशुसंवर्धन विभाग
आवक क्र...९८२........
दिनांक: ०५/०१/२०२४...

Deputy Commissioner 4 <dmc4@mbmc.gov.in>

## Fwd: Right to Information Act, 2005 (माहिती अधिकार) अंतर्गत मिरा भाईंदर महानगपालिकेचे पशु वैद्यकीय विभागाकडून माहिती मिळण्याबाबत. | दोन वर्षांपासून सभागृहात पास झालेला भटके आणि पाळीव प्राण्यांसाठी दफनभूमी चा विषय अजून कागदावरच आहे

**Commissioner MBMC** <commissioner@mbmc.gov.in> Wed, Jan 3, 2024 at 10:49 AM
To: dmc4@mbmc.gov.in, animalhusbandary@mbmc.gov.in
Cc: For Future India Official <forfutureindiaofficial@gmail.com>

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. उपायुक्त प्रशासन
आवक क्र.: 3404
दिनांक: - 04/01/24

---------- Forwarded message ---------
From: **For Future India** <forfutureindiaofficial@gmail.com>
Date: Tue, Jan 2, 2024 at 10:27 PM
Subject: Right to Information Act, 2005 (माहिती अधिकार) अंतर्गत मिरा भाईंदर महानगपालिकेचे पशु वैद्यकीय विभागाकडून माहिती मिळण्याबाबत. | दोन वर्षांपासून सभागृहात पास झालेला भटके आणि पाळीव प्राण्यांसाठी दफनभूमी चा विषय अजून कागदावरच आहे
To: <mbmc.commissioner@gmail.com>, <animalhusbandary@mbmc.gov.in>, <commissioner@mbmc.gov.in>
Cc: <dhirajparablokmat@gmail.com>, Dhiraj Parab <dhirajparab1@gmail.com>, pradeep jangam <Jangampradeep9@gmail.com>, Irba Konapure <adv.irbakonapure@gmail.com>, <namdevkashid4@gmail.com>, <advguptakrishna@gmail.com>, HARSHAD DHAGE <harshadvdhage0021@gmail.com>

**श्री. विक्रम निराटले**
**पशुवैदयकीय अधिकारी**
पशु वैद्यकीय विभाग, मिरा भाईंदर महानगपालिका

**<u>विषय :- Right to Information Act, 2005 (माहिती अधिकार) अंतर्गत मिरा भाईंदर महानगपालिकेचे पशु वैद्यकीय विभागाकडून माहिती मिळण्याबाबत.</u>**

नमस्कार,

मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने हाती घेतलेल्या पशुवैद्यकीय सेवा आणि पशु कल्याण उपायांशी संबंधित विविध पैलूंबाबत 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये' अंतर्गत माहिती आणि स्पष्टीकरण मिळविण्यासाठी आम्ही विनंती पत्र लिहीत आहोत.

**<u>खालील बाबींवर तपशीलवार माहिती मिळावी :-</u>**
१. दोन वर्षांपासून सभागृहात पास झालेला भटके आणि पाळीव प्राण्यांसाठी दफनभूमी चा विषय अजून कागदावरच आहे.
२. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पाळीव प्राण्यांचे हॉस्पिटल विषयी माहिती.
३. जिल्हाधिकारी यांच्या हद्दीतील भाईंदर पश्चिमेचे दवाखाना बंद आहे.
४. भाईंदर पश्चिम व मिरा रोड येथील मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दवाखाने अद्याप कोणाला माहित नाही. याची माहिती कोणत्याही सोशल साईट वर उपलब्ध नाही.
५. भाईंदर पूर्वेला दवाखाना नाही.
६. स्थलांतर समुद्री पक्षांविषयी जागरूकता नाही. ( पक्षांना चणे व गाठीया खायला देणाऱ्यांना समजवले तरी महानगपालिकेचा बोर्ड कुठे असं सांगण्यात येत. अनेकदा पाठपुरावा केल्यानंतरही बोर्ड आजवर भाईंदर खाडीवर नाही. )
७. प्राण्यांना खायला घालणाऱ्या प्राणीमित्र व स्थानिकांचा वाद दर महिन्याला १०-१५ केसेस पोलीस चौकीत आहेत तरी हस्तक्षेप करून नियमावली व 'Feeding Place' तयार करण्यात आले नाही.
८. महापौरांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर 'Mobile Ambulance' महानगरपालिकेच्या पार्किंग मध्ये च आहे.
९. प्रकाशित माहितीप्रमाणे 'पाच ते सात दिवसात २० ते ३० हजार श्वानांना रेबीज चे इंजेक्शन दिले जाणार आहे'. प्राणीप्रेमींसाठी आनंदाची

Scanned with OKEN Scanner

बातमी आहे परंतु या सात दिवसात अंदाजे २५ हजार जरी श्वान पकडले तरी मिनिटाला २ ते ३ श्वानांना रेबीजचे इंजेक्शन देण्यात येईल. प्राणी प्रेमींसाठी पारदर्शकता असायला हवी.

12 attach

आम्हाला विश्वास आहे की या माहितीमुळे केवळ पारदर्शकता वाढणार नाही तर आपल्या समुदायातील प्राण्यांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी महानगरपालिकेने उचललेली पावले समजून घेण्यास देखील मदत होईल.

'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये' मधील तरतुदींनुसार संबंधित पशु वैद्यकीय विभागाकडून विहित १५ दिवसात आवश्यक माहिती आणि स्पष्टीकरण द्यावे अशी आम्ही नम्र विनंती करतो.

टीप :-

अ. दोन वर्षांपासून सभागृहात पास झालेला भटके आणि पाळीव प्राण्यांसाठी दफनभूमी चा विषय अजून कागदावरच आहे. याविषयी केले पत्र व्यवहाराचे प्रत जोडत आहोत.

१. दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी महानगपालिका आयुक्त, महापौर, उप महापौर, अतिरिक्त आयुक्त यांना दिलेले पत्र
२. दिनांक ०७ एप्रिल २०२२ रोजी महानगपालिका आयुक्त, महापौर, उप महापौर, अतिरिक्त आयुक्त यांना दिलेले स्मरण पत्र २
३. दिनांक ०८ एप्रिल २०२२ रोजी उप महापौर यांनी आयुक्त व महापौर यांना दिलेले पत्र
४. दिनांक २३ मे २०२२ रोजी पशुवैदयकीय अधिकारी यांचे प्राप्त झालेले पत्र
५. दिनांक १ जून २०२२ रोजी कार्यकारी अभियंता यांनी उप महापौर यांना दिलेले पत्र
६. दिनांक १७ आगस्ट २०२२ रोजी महानगपालिका आयुक्त यांना दिलेले स्मरण पत्र ३
७. दिनांक १९ जून २०२३ रोजी महानगपालिका आयुक्त यांना दिलेले स्मरण पत्र ४

ब. मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून शहरातील ( भटके ) पशु-पक्षांसाठी वैद्यकीय उपचार मिळावे यासाठी करण्यात आलेला पत्र व्यवहाराचे प्रत जोडत आहोत.

१. दिनांक २६ नोंव्हेबर २०२१ रोजी महानगपालिका आयुक्त यांना दिलेले पत्र
२. दिनांक ११ जानेवारी २०२२ रोजी महानगपालिका आयुक्त यांना दिलेले पत्र २
३. दिनांक २४ जानेवारी २०२२ रोजी पशुवैदयकीय अधिकारी यांचे प्राप्त झालेले पत्र
४. दिनांक ०७ एप्रिल २०२२ रोजी महानगपालिका आयुक्त यांना दिलेले स्मरण पत्र ३
५. दिनांक १७ आगस्ट २०२२ रोजी महानगपालिका आयुक्त यांना दिलेले स्मरण पत्र ४

आपला नम्र,

**फॉर फ्युचर इंडिया**
+91 7738189871
forfutureindiaofficial@gmail.com
www.forfutureindia.org

**श्री. हर्षद ढगे**
**फॉर फ्युचर इंडिया - संस्थापक / अध्यक्ष**
+91 9820952079
harshadvdhage0021@gmail.com
www.harshaddhage.com

Note :- "The harmony of our nation thrives not merely in the deeds of malevolent individuals but within the reverberating silence of those who remain indifferent."
In case of any discrepancies in our submissions, we kindly request relevant documentation in writing, enabling us to serve society as a responsible citizen. Our commitment is not driven by personal vendettas against any government officer. Rather, it's directed towards combating corrupt practices among officers and public servants that foster and shield illegal activities.
As we tread the path of nature conservation, let us collectively pledge to protect our environment. Let our actions echo our commitment to preserving the natural world for future generations. Together, let's strive for sustainable practices and responsible stewardship of our ecosystems, safeguarding the invaluable biodiversity of our planet. Join the chorus of responsible stewardship, for in the symphony of nature, our voices together compose the enduring melody of preservation and harmony.

Scanned with OKEN Scanner

Application for obtaining information ...
अर्जाचा नमुना

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८,

०८/०१/२०२४

जा.क्र मनपा/पसं/ मा.अ./ २२ /२०२३-२४ दिनांक :- २६ / ०१ /२०२४

प्रति,
श्री. हर्षद ढगे
फॉर फ्युचर इंडिया –संस्थापक/अध्यक्ष
9820952079

विषय : केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५.
संदर्भ : आपला माहितीचा अधिकार बाबतचा दि. 03/01/2024 रोजीचा ई-मेल.

महोदय,

आपले माहिती अधिकार अंतर्गत दि. ०५/०१/२०२४ रोजीचे या कार्यालयास प्राप्त झालेले पत्रामधील विविध मुद्यांच्या अनुषंगे खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | माहिती आधाराखाली विचारलेले प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | दोन वर्षापासून सभागृहात पास झालेला भटके आणि पाळीव प्राण्यांसाठी दफनभुमी चा विषय अजून कागदावरच आहे | सदरचा विषय सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत आहे. |
| 2 | मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पाळीव प्राण्यांचे हॉस्पिटल विषयी माहिती | निरंक |
| 3 | जिल्हाधिकारी यांच्या हद्दीतील भाईंदर पश्चिमेचे दवाखाना बंद आहे. | सदरचा विषय जिल्हा पशुसंवर्धन मुलुंड ठाणे विभागाशी निगडीत आहे. |
| 4 | भाईंदर पश्चिम व मिरा रोड येथील मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दवाखाने अद्याप कोणाला माहित नाही. याची माहिती कोणत्याही सोशल साईट वर उपलब्ध नाही. | मिरा भाईंदर महानगरपालिकेचा पशुवैद्यकीय दवाखाना नाही आहे. |
| 5 | भाईंदर पूर्वेला दवाखना नाही. | मिरा भाईंदर महानगरपालिकेचा पशुवैद्यकीय दवाखाना नाही आहे. |
| 6 | स्थलांतर समुद्री पक्षांविषयी जागरुकता नाही (पक्षांना चणे व गाठीया खायला देणाऱ्यांना समजवले तरी महानगरपलिकेचा बोर्ड कुठे असं सांगण्यात येत अनेकदा पाठपुरवठा केल्यानंतरही बोर्ड आजवर भाईंदर खाडीवर नाही.) | आपल्या सुचनेची दखल घेतली जाईल. |
| 7 | प्रांण्याना खायला घालणाऱ्या प्राणीमित्र व स्थानिकांचा वाद दर महिन्याला 10-15 केसेस पोलीस चौकीत आहेत तरी हस्तक्षेप करुन नियमावली व 'Feeding Place' तयार करण्यात आले नाही. | ABC RULE २०२३ प्रमाणे 'Feeding Place' निश्चित करणेकामी जिल्हा SPCA ची स्थापना झाल्यानंतर कार्यवाही करण्यांत येईल. |
| 8 | महापौरांच्या हस्ते उदघटन झाल्यानंतर 'Mobile Ambulance' महानगरपालिकेच्या पार्किग मध्येच आहे. | प्रत्यक्ष जागेवर जावुन आजारी पशुपक्षी यांच्यावर नियमित पणे उपचार केले जातात. पार्किंग साठी अब्म्युलंन्स महापालिकेच्या आवरात उभी असते. |
| 9 | प्रकाशित माहितीप्रमाणे पाच ते सात दिवसात 20 ते 30 हजार श्वानांना रेबीज चे इंजेक्शन दिले जाणार आहे. प्राणीप्रेमींसाठी आनंदाची बातमी आहे परंतु या सात दिवसात अंदाजे 25 हजार जरी श्वान पकडले तरी मिनिटाला 2 ते 3 श्वानांना रेबीजचे इंजेक्शन देण्यात येईन. प्राणी प्रेमीसाठी पारदर्शकता असायला हवी. | श्वांन दंश लसीकरण मोहिम सर्व प्रभाग निहाय जागतिक पशुवैद्यकीय सेवा व महानगरपालिका मार्फत करण्यात येईल. |

(डॉ. विक्रम निराटले)
जनमाहिती अधिकारी,पशुसंवर्धन विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner